**नियमित दिवाणी दावा नं. १२५/२०१९**
**(सौरभ वगैरे वि. संजय वगैरे)**

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश
**(दिनांक ०१.०४.२०२१)**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला.

२. वादींच्या म्हणण्यानुसार भूमापन क्र. २७२ हिस्सा ५ आणे ४ पै हा दाव्याचा वाद विषय आहे. वादी क्र. १, २ आणि प्रतिवादी क्र. २, ३ ही वादी क्र. ३ आणि प्रतिवादी क्र. १ यांची अपत्ये आहेत. वादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही त्यांची एकत्र कुंटूंबाची वडीलार्जित मिळकत आहे. दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ यांचे वडील नामे ज्ञानू माळी यांची होती. ज्ञानू माळी मयत झाल्यानंतर दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे झाली. सदर दावा मिळकतीमध्ये उभय पक्षकारांदरम्यान कधीही सरसनिरस मानाने वाटप झाले नाही. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ कडून कर्ज घेतल्याचे वादींना प्रतिवादी क्र. ४ कडून तोंडी कळाले. सदर कर्जापोटी प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ ला तारण दिल्याचे कळाले. त्यानंतर वादींनी प्रतिवादी क्र. ४ कडे कर्जाबाबतची कागदपत्रे मागितली असता प्रतिवादी क्र. ४ ने त्यांना सांगितले की, सदरचा व्यवहार तोंडी होता. आजअखेर प्रतिवादी क्र. १ कडून नोंदणी गहाणखत करुन घेतलेले नाही. अशाप्रकारे प्रतिवादी क्र. ४ ने कागदपत्र देण्यास नकार दिला. वादींनी असाही आरोप केला आहे की, प्रतिवादी क्र. १ हा दारुच्या व्यसनामुळे, चैनी वृत्तीमुळे आणि राजकीयपणामुळे त्यांचा व प्रतिवादी क्र. २ व ३ चा सांभाळ करत नाही. वादींचा वाद मिळकतीत १/५ हिस्सा आहे. वादींच्या हिश्यावर अगर प्रतिवादी क्र. १ च्या हिश्यावर प्रतिवादी क्र. १ ने कुणासाठी कर्ज काढले असेल तर प्रतिवादी क्र. ४ यांना कायदयाने मिळकत जप्त करता येणार नाही. तसे झाल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. १ ने जरी कर्ज घेतले असले तरी ते कर्ज कुंटूंबाच्या हिताकरिता अथवा प्रगतीकरिता घेतलेले नाही. कर्ज घेतल्याबाबत प्रतिवादी क्र.

१ ने वादींना कधीही सांगितले नाही. त्यामुळे सदरील कर्ज वादींच्या हिश्यावर बंधनकारक नाही. प्रतिवादी क्र. ४ हे वादी राहत असलेल्या ठिकाणी येवून अर्वाच्च भाषेत बोलून वाद मिळकत जप्त करुन विक्री करणार असल्याचे सांगत आहेत. वादींनी असाही आरोप केला आहे की, प्रतिवादी क्र. १ त्यांना म्हणाला की मी वाद मिळकत विक्री करणार आहे, तुला काय करायचे आहे ते करुन घे. वादींनी प्रतिवादी क्र. १ ला वाटपाची मागणी केली परंतु प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०७.०४.२०१९ रोजी स्पष्ट नकार दिला. तसेच प्रतिवादी क्र. १ हा वादींना व प्रतिवादी क्र. २ व ३ यांना वाद मिळकतीतून बाहेर जा असे म्हणाला. त्यानंतर त्यांच्या दरम्यान वाद झाला. एकंदरित वादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत वडीलोपार्जित असून त्यात त्यांचा हिस्सा आहे. कथित कर्जाच्या वसुलीसाठी वाद मिळकत प्रतिवादी क्र. ४ ला जप्त करता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ दावा मिळकतीतील वादींच्या ताब्यास अडथळा करत असून तो मिळकत तबदिल करण्याच्या प्रयत्नात आहे. सरतेशेवटी वादींनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. १ न्यायालयासमक्ष हजर झाले नाही त्यामुळे त्यांच्याविरुध्द दाव्याची सुनावणी एकतर्फा चालविण्यात आली.

४. वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. आर. देसाई यांनी युक्तिवाद केला. विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार वाद मिळकत ही वादींची वडीलार्जित मिळकत आहे. वाद मिळकतीत वादींचा समान हिस्सा आहे. अदयापपर्यंत वाद मिळकतीचे वाटप झालेले नाही परंतु प्रतिवादी क्र. १ हा प्रतिवादी क्र. ४ च्या संगणमताने सर्व मिळकत विकण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे विधिज्ञांनी प्रतिवादी क्र. १ ला दावा मिळकत तबदिल करण्यापासून प्रतिबंध करण्याची विनंती केली.

५. वादीतर्फे युक्तिवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. खालील मुददे माझ्या विचाराधीन आहेत व त्यावर मी माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृतदर्शनी वाद असल्याचे शाबीत केले आहे का? | **नकारार्थी.** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे, असे वादींनी शाबीत केले आहे का ? | **नकारार्थी.** |
| ३. | तात्पुरत्या मनाईचा अर्ज नामंजुर झाल्यास, वादींचे कशानेही न भरुन येणार असे नुकसान होईल, असे वादींनी शाबीत केले आहे का ? | **नकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**का र ण मि मां सा**

६. वादींनी यादी निशाणी क्र. ३ खालील दस्तांवर भिस्त ठेवली.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत –**

७. मुददा क्र. १ ते ३ एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांचा एकत्रीत विचार करण्यात येतो.

८. वादींच्या म्हणण्यानुसार वाद मिळकत ही वडीलार्जित असून ज्ञानू माळी मयत झाल्यानंतर ती मिळकत प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे आली. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ हजर झाला नाही परंतु, प्रतिवादी क्र. ४ ने त्यांचे म्हणणे दाखल केले. प्रस्तुत अर्जाचा विचार करतेवेळी प्रतिवादी क्र. ४ च्या म्हणण्यास डावलता येणार नाही. प्रतिवादी क्र. ४ ने दावा मिळकत वादींची वडीलार्जित मिळकत असल्याचे स्पष्ट नाकारले. प्रतिवादी क्र. ४ च्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ ने नोंदणी दस्त क्र. १५५/२००० आणि ८४०/२००० अन्वये वाद मिळकत दिनकर माने आणि विजया माने, वैशाली माने यांच्याकडून खरेदी केली. प्रतिवादी क्र. ४ ने विशिष्ट दस्त क्रमांकांचा उल्लेख करुन वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ ची स्वकष्टार्जित असल्याचे नमूद केले. याबाबतीत वादीतर्फे कोणताही खुलासा करण्यात आला नाही. वाद मिळकत वडीलार्जित आहे दाखविण्याकामी

वादींनी ७/१२ उता–यावर त्यांची भिस्त ठेवली. ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ संजय माळी यांच्या नावे भूमापन क्र. २७२ मध्ये २ हे ६८ आर जमिन आहे. असेही दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी भारती विकास सोसायटी कडून कर्ज घेतले होते. कर्जाचा बोजा फेरफार नं. ५०७१ द्वारे ७/१२ पत्रकी टाकण्यात आला. प्रतिवादी क्र. १ च्या नावे वादमिळकत कशी आली हे दाखविण्यासाठी वादींनी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. वादींचे तोंडी कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ चे वडील ज्ञानू माळी मयत झाल्यानंतर वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या नावे आली. अशा परिस्थितीत वारसा फेर उतारा पटलावर दाखल करणे अपेक्षित होते परंतु वादींनी तो दाखल केला नाही. ज्याअर्थी प्रतिवादी क्र. ४ ने विशिष्ट नोंदणी दस्त क्रमांक त्यांच्या म्हणण्यात नमूद केले आणि ज्याअर्थी वारसा फेर उतारा पटलावर दाखल नाही त्याअर्थी वाद मिळकत वडीलार्जित आहे असे म्हणता येत नाही. वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ संजय यांची स्वकष्टार्जित मिळकत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ ने यादी निशाणी क्र. २३ वर दाखल केलेले दस्त दुर्लक्षित करता येणार नाहीत. दिनांक २३.०३.२०२० रोजी वसुली व विक्री अधिकारी यांनी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांना दिलेले पत्र पटलावर दाखल करण्यात आले. सदर पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गट क्र. २७२ बाबतचा फेर जाहीर लिलाव दिनांक २४.०२.२०२० रोजी पुकारण्यात आला होता. सदर लिलावादरम्यान संजय लक्ष्मण शिंदे यांनी एक कोटी सात लाख चौ–यात्तर हजार इतकी बोली लावून लिलाव प्राप्त करुन घेतला. सदर पत्राद्वारे संजय लक्ष्मण शिंदे यांच्या नावे विक्री कायम करुन देण्याची विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे दिनांक ०१.०६.२०२० रोजी जिल्हा उपनिबंधक यांच्याद्वारे सदर लिलावास कायम करण्यात आले. एकंदरित लिलावावेळी संजय लक्ष्मण शिंदे यांना वाद मिळकतीचा खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आले. प्रस्तुतच्या अर्जावर वादींनी दिनांक ०३.०३.२०२१ रोजी युक्तिवाद केला. म्हणजेच

प्रस्तुतच्या अर्जावर वादीतर्फे युक्तिवाद होण्याअगोदरच वाद मिळकतीचा जाहीर लिलाव होवून संजय लक्ष्मण शिंदे यांना खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आले. एका अर्थाने प्रस्तुतचा अर्ज निष्फळ ठरला.

**१०.** वर सांगितल्याप्रमाणे वाद मिळकत ही वडीलार्जित आहे असे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी वाद वादींच्या हक्कात नाही. त्याचप्रमाणे न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसानीचा मुददा वादींच्या हक्कात नाही. त्यामुळे मी मुददा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे. मुददा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/–
(पी. व्ही. सुर्यवंशी)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पलूस.

पलूस.
दिनांक ०१.०४.२०२१.

---

I affirm that the contents of the PDF file judgment are same, word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shri. Ajinkya R. Edake. (L.G.). |
| Court Name | : | Shri. Prashant V. Suryavanshi<br>Civil Judge Junior Division &<br>Judicial Magistrate First Class,<br>Palus, Dist. Sangli. |
| Date of Typing | : | 01.04.2021 |
| Judgment signed<br>by Presiding Officer on | : | 01.04.2021 |
| Judgment uploaded on | : | 01.04.2021 |

---